CNR-No.MHLA15000269-2008

**<u>रे.दि.मु.नं. ५८/२००८ मधील नि.क्र.२५३ खालील आदेश</u>**

(नारायण वि.. ज्ञानोबा व इतर )

1. प्रकरणातील मुळ प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरूस्ती होवून परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

2. त्यांचे थोडक्यात कथन असे की, सदर प्रकरणातील मुळ प्रतिवादी क्र. २/ब मंगलाबाई ही दाव्याच्या संपरिक्षे दरम्यान अज्ञान होती. आता ती सज्ञान झालेली आहे. तिचे लग्न नागेश चांडे रा. बाभळगांव ता. व जि. लातूर यांच्याशी झालेले असून तिचे वय २० वर्ष पुर्ण झालेले असल्याचे सांगितले. त्याबाबत मुळ प्रतिवादी क्र. २/ब मंगलाबाई उर्फ प्रियंका नागेश चांडे हिच्या जिल्हा परिषद शाळा, विवेकानंद नगर नळेगांव या शाळेचा निर्गम उतारा जन्माच्या तारखेचा पुरावा म्हणून दाखल केली आहे. त्यामुळे त्यांनी मुळ प्रतिवादी क्र. २/ब नामे मंगलाबाई उर्फ प्रियंका नवनाथ गजीले (मंगलाबाई उर्फ प्रियंका नागेश चांडे) वय २० वर्ष रा. बाभळगांव ता. जि. लातूर अशी दुरुस्ती करण्याची विनंती केली. सोबत त्यांनी मुळ प्रतिवादी क्र. ३ चे शपथपत्र दाखल केले.

3. याउलट, वादीच्या वकीलांनी कायद्यामधील मुदतीच्या अनुषंगाने योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती करुन सदर अर्जावर जास्त खर्च लावण्याची विनंती केली. तसेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ यांनी सुध्दा कांहीही म्हणणे सदर अर्जावर दाखल केले नाही.

4. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यामध्ये मुळ प्रतिवादी क्र.२/ब हिचे नांव प्रतिवादी क्र.२ सागरबाई मयत झाल्यानंतर अभिलेखावर घेण्यात आले होते. सदरचा दावा हा दहा वर्षापेक्षा जुना असून दरम्यानच्या कालावधीत मुळ प्रतिवादी क्र.२/ब मंगलाबाई उर्फ प्रियंका नवनाथ गजीले हिच्या वडीलांचे नांव नमुद होते. सदर प्रकरणात मुळ प्रतिवादींनी प्रतिदावा सुध्दा दाखल केला आहे. सदर प्रकरणात मनाईहुकूम मागितलेला असून प्रतिदाव्यामध्ये नामधारी खरेदीखत परतवून देण्याची मागणी केलेली आहे.

5. दावा सुरु असतांनाच्या कालावधीत मुळ प्रतिवादी क्र. २/ब चे लग्न झाल्याचे प्रतिवादींचे कथन आहे. सदर कथनाला तसेच त्यांनी दाखल केलेल्या शाळेच्या निर्गम उता–याला व जन्म तारखेला मुळ वादीने हरकत घेतलेली नाही. तसेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ यांनी सुध्दा कांहीही म्हणणे सदर अर्जावर दाखल केले नाही. त्यामुळे मुळ प्रतिवादी क्र. २/ब ही सज्ञान झालेली असून तिचे लग्न झालेले असल्याचे दिसून येते, त्यामुळे कायद्यानुसार मुळ प्रतिवादी २/ब हिने सज्ञान झाल्यानंतर तीन वर्षात सदर दाव्याबाबत तिचे म्हणणे दाखल करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर अर्जानुसार मागितलेली दुरुस्ती ही रास्त आहे. सदर दाव्यामध्ये दुरुस्ती नाही केल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे.

6. तसेच दाव्यातील दुरुस्ती ही दावा सुरु असतांना घडलेल्या नैसर्गीक कृतीवर आधारीत असल्याने तसेच मिळकत किंवा पक्षकार यात बदल होत नसल्याने आणि वाद विषयाचे गुणदोषावर अंतिम निराकरण करण्याकरिता सदरची दुरूस्ती मंजूर होणे न्यायाचे व गरजेचे आहे. दाव्यास सविस्तर कैफियत देवून म्हणणे मांडणेची संधी निश्चितच वादीला व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ ला मिळणार आहे. वाद विषयांची अनेकता व गुंतागुंत टाळण्यासाठी माझे असे मत आहे की, मुळ प्रतिवादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मुळ प्रतिवादींना प्रस्तुत अर्जान्वये मागितलेल्या दुरूस्त्या मुळ दाव्यामध्ये वैधानिक कालावधीमध्ये करुन घेण्याचे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Yogesh Dattatray Koinkar
Date: 2020.01.18 18:00:55 +0530

स्थळ– चाकूर

दिनांक– १८/०१/२०२०

**(योगेश डी. कोईनकर)**
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर